पिंपरी चिंचवड महानगरपालिका, अ प्रभाग समिति

सभावृतांत [ कार्यपत्रिका क्रमांक ११ ]

दिनांक : ३१ /१२/२०१६ वेळ : सकाळी ११.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ प्रभाग समितीची विशेष सभा [ मा. सभापती, अ प्रभाग समिती यांचे दि. 29/12/2016 रोजीचे पत्रास अनुसरुन ] शनिवार दिनांक ३१/१२/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता अ क्षेत्रीय कार्यालयातील " राजमाता जिजाऊ सभागृह " येथे आयोजित करणेत आली होती. सदर सभेस खालील सन्मा. सदस्य/सदस्या उपस्थित होते.

| | | |
|---|---|---|
| 1. | मा. पांढरकर निलेश शंकरराव | सभापती |
| 2. | मा. पात्रे राम संभाजी | सदस्य |
| 3. | मा. बाबर शारदा प्रकाश | सदस्या |
| 4. | मा. सुभद्रा ईश्वर ठोंबरे | सदस्या |
| 5. | मा. भारती फरांदे | सदस्या |
| 6. | मा. आर.एस.कुमार | सदस्य |
| 7. | मा. भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर | सदस्या |
| 8. | मा. राजू मिसाळ | सदस्य |
| 9. | मा. नंदा विकास ताकवणे | सदस्या |
| 10. | मा. नेटके सुमन राजेंद्र | सदस्या |
| 11. | मा. तरस बाळासाहेब जयवंत | सदस्य |
| 12. | मा. काळभोर वैशाली जालिंदर | सदस्या |
| 13. | मा. साळुंके सविता सुरेश | सदस्या |
| 14. | मा. शेख अस्लम शौकत | सदस्य |
| 15. | मा. सतिश झांबरे | स्वीकृत सदस्य |

तसेच श्रीम. आशादेवी दुरगुडे - मा. क्षेत्रीय अधिकारी, श्री संजय खाबडे – मा. कार्यकारी अभियंता, विदयुत , श्री विशाल कांबळे , मा. कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा , मा. सतिश इंगळे, कार्यकारी अभियंता – स्थापत्य, श्रीम.रेखा गाडेकर – प्रशासन अधिकारी तथा सचिव (सभाशाखा), श्री विजय भोजने, उपअभियंता, बीआरटीएस, श्री संजय काशीद – उपअभियंता, पाणीपुरवठा, श्री. महादेव शिंदे – सहा. आरोग्याधिकारी, श्री पी.जे. कदम – लेखाधिकारी , श्री वैदय संदीप कनिष्ठ अभियंता, पाणीपुरवठा इ. उपस्थित होते.

मा. सभापती, श्री. पांढरकर निलेश यांनी उपस्थित सन्मा. नगरसदस्य, नगरसदस्या व अधिकारी यांचे स्वागत करून सभा सुरु करणेस अनुमती दिली.

विषय क्रमांक १ करीता सन्मा सदस्य आर. एस. कुमार, मा. वैशाली काळभोर, मा. बाळासाहेब तरस, मा. सुमन नेटके, मा.भारती फरांदे, मा. सुभद्रा नेटके, मा नंदा ताकवणे, प्रतिभा भालेराव यांनी खालील प्रमाणे लेखी उपसूचना दिली.

के.एस.बी. चौक ते कस्पटे वस्ती, वाकड या बीआरटीएस रस्त्यास कै. श्री प्रल्हाद छाब्रिया [फिनोलेक्स इंडस्ट्रीज ] यांचे नावाचे फलक ठिकठिकाणी लावणेस व रस्त्याचे कायमस्वरुपी सुशोभिकरण करणेस फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांना मान्यता देणेच्या उपसूचनेसह सदरचा विषय मंजुर करणेत यावा. प्रस्तुतची उपसूचना मा. सभापती यांनी स्वीकारली.

ठराव क्रमांक : ८९ विषय क्रमांक : १

दिनांक : ३१/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा.सविता साळुंके अनुमोदक : मा. अस्लम शेख

संदर्भ :- सन्मा.सदस्या सविता साळुंके, सदस्य अस्लम शेख यांचा दि.28/12/2016 रोजीचा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 27, फिनोलेक्स इंडस्ट्रीज लिमिटेड यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेला त्यांचे मालकी हक्काची 8 एकर जागा मनपाकडून कोणताही मोबदला न घेता रस्ता रुंदीकरणाकरीता दिली आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहराच्या जडणघडणीमध्ये कै. श्री. प्रल्हाद छाब्रिया, उदयोजक यांचे मोठे योगदान असल्याने के.एस.बी. चौक ते कस्पटे वस्ती, वाकड या बीआरटीएस रस्त्यास कै. श्री प्रल्हाद छाब्रिया [फिनोलेक्स इंडस्ट्रीज ] यांचे नाव देणेस तसेच त्यांचे नावाचे फलक ठिकठिकाणी लावणेस व रस्त्याचे कायमस्वरुपी सुशोभिकरण करणेस फिनोलेक्स इंडस्ट्रीज यांना मान्यता देणेच्या उपसूचनेसह मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

------

ठराव क्रमांक : ९० विषय क्रमांक : २

दिनांक : ३१/१२/२०१६ विभाग :

सुचक : मा. सविता साळुंके अनुमोदक : मा. अस्लम शेख

संदर्भ :- सन्मा.सदस्या सविता साळुंके, सदस्य अस्लम शेख यांचा दि. 28/12/2016 चा प्रस्ताव

प्रभाग क्रमांक 27 मोरवाडी येथील सम्राट चौकांचे सुशोभिकरणाचे काम श्रीमंत जगदगुरु साईबाबा प्रतिष्ठान या सामजिक संस्थेमार्फत करुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला

-----

वरील प्रमाणे अ प्रभाग समितीच्या विशेष सभेचे कामकाज होऊन मा. सभापती निलेश पांढरकर यांनी वरील मंजुर ठरावांवर सभावृतांत कायम होण्याची वाट न पाहता कार्यवाही सुरु करणेच्या सुचना देऊन प्रस्तुतची सभा संपलेचे जाहीर केले.

(निलेश शंकरराव पांढरकर)
सभापती
अ प्रभाग समिती

क्र. अक्षेका /११/कावि/०३/२०१७

दे २/१/२०१७

प्रशासन अधिकारी तथासचिव
(सभाशाखा)
अ प्रभाग समिती
निगडी - ४४

प्रत सर्व संबंधित विभाग